ePaper

# अजित पवारांचा अपमान म्हणजे भाजपचं खालच्या पातळीचं राजकारण -अमोल मिटकरी



| वर्ष - 6 । अंक - 71 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- अनाधिकृत राडारोडा टाकणाऱ्या खाजगी विकासकाला दंड
- पंतप्रधान आणि केंद्र सरकारला सद्बुद्धी दे!
- आता विधान परिषदेसाठी चुरस

www.mahaenews.com | । बुधवार । दिनांक 15 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"शिवसेना असो वा इतर कोणताही पक्ष असो, जे लोक परखड भूमिका मांडतात, पक्षवाढीसाठी काम करतात, अशा सगळ्यांना केंद्रीय तपास यंत्रणा त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय सूड, राजकीय बदला, राजकीय द्वेष उगवण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर केला जात आहे. गेल्या तीन दिवसांपासून काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांची चौकशी सुरू आहे, असे प्रकार आणखी काही दिवस सुरूच राहतील."

-संजय राऊत, शिवसेना नेते

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडीच्या मुद्द्यावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपण या निवडणुकीमध्ये उमेदवारांच्या शर्यतीत नसल्याचं स्पष्ट केलंय. मात्र"पवार साहेब, राष्ट्रपती निवडणुकीतून पराभवाच्या भीतीने माघार घेण्याचा निर्णय तुमचा योग्य आहे कारण तुमच्याकडे मुख्यमंत्री आहेत. ते म्हणतील तुम्हाला, 'मी म्हणतोय ना तुम्हाला राष्ट्रपती मग जिंकायची गरज काय? आजपासून तुम्ही राष्ट्रपती',

- नीलेश राणे, भाजप नेते



## श्रीक्षेत्र देहूगाव येथील शिळा मंदिराचे लोकार्पण

# पालखी मार्गासाठी 11 हजार कोटी!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मोठी घोषणा



। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचे काम पाच टप्प्यात आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे काम तीन टप्प्यात पूर्ण होईल. या प्रकल्पातील एकूण मार्गाची लांबी 350 किलोमीटरपेक्षा जास्त लांब महामार्ग तयार केला जाईल. त्यासाठी 11 हजार कोटी रुपयांचा खर्च होईल, अशी घोषणा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.**



श्रीक्षेत्र देहूगाव येथील संत तुकाराम महाराज शिळा मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते मंगळवारी करण्यात आले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य अतुल भोसले, श्रीक्षेत्र देहू संस्थान अध्यक्ष नितीन महाराज मोरे व्यासपीठावर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वारकऱ्यांना संबोधित करताना मराठीतून सुरुवात केली. तसेच, त्यांनी समस्त वारकऱ्यांच्या चरणी नमस्कार म्हणून आपल्या भाषणाला प्रारंभ केल्याने त्यांनी सर्व वारकऱ्यांची मने जिंकली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वारकऱ्यांना संबोधित करताना म्हंटले, की भगवान विठ्ठल आणि वारकऱ्यांच्या चरणी माझा कोटी-कोटी नमस्कार. काही महिन्यांपूर्वी पालखी मार्गावरील दोन राष्ट्रीय महामार्गांच्या चौपदीकरणाचे भूमिपूजन करण्याची संधी मिळाली. पंढरपुरातील पालखी मार्गाप्रमाणे चारधाम मार्ग, सोमनाथ मंदिर आणि अयोध्येतील राममंदिराचे कामही वेगाने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

### मोदी, फडणवीस अन् अजित पवारांमध्ये चर्चा...

दरम्यान, शिळा मंदिर लोकार्पण सोहळ्यानंतर पंतप्रधान मोदी, उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी देहू ते मुंबई एकत्रित प्रवास केला. यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

व्यासपीठावर उपस्थितीत असलेल्यापैकी देवेंद्र फडणवीस, देहू संस्थानचे अध्यक्ष नितीन महाराज मोरे या तिघांची भाषणे झाली. मात्र, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव भाषणासाठी न पुकारल्यामुळे आता कार्यक्रमाच्या आयोजक समितीवर टीका होते आहे.

पंतप्रधान मोदी यांनीच याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. त्यावरून राजकीय वातावरण पेटले आहे.

### ... हा तर अजित पवार यांचा अवमान : सुप्रिया सुळे

देहूतील कार्यक्रमात अजित पवार यांना बोलू न देणे हा महाराष्ट्राचा अपमान आहे असं मला वाटतं, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. तर, भाजपने याबाबत माफी मागावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे.सुरुवातीला नितीन महाराज मोरे यांचे प्रस्ताविकपर भाषण झाले. त्यानंतर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस बोलले. त्यांच्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे भाषण होईल असे अपेक्षित होते. ते राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. पण, त्यांच्यानंतर थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण सुरू झाले, अशी भूमिका खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### वैद्यकीय प्रवेशाच्या आमिषाने जीएसटी अधिकाऱ्याची आठ लाखांची फसवणूक

पुणे । महाईन्यूज ।

वैद्यकीय महाविद्यालयात मुलीला प्रवेश मिळवून देण्याच्या आमिषाने वस्तू आणि सेवाकर कार्यालयातील (जीएसटी) अधिकाऱ्याची आठ लाख दोन हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलिसांनी एका महिले विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मुग्धा उर्फ मिताली हेमंत कुलकर्णी (रा. कल्याण, जि. ठाणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत जीएसटी कार्यालयातील अधिकाऱ्याने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार अधिकारी आणि आरोपी मुग्धा कुलकर्णी यांची एका कार्यक्रमात ओळख झाली होती. त्या वेळी कुलकर्णीने वकील असल्याचे त्यांना सांगितले होते. न्यायाधीश परीक्षा उत्तीर्ण झाल्याची बतावणी तिने त्यांच्याकडे केली होती. त्यानंतर कुलकर्णी आणि तक्रारदार अधिकाऱ्याचा संवाद वाढला.

### धायरीतील रायकर नगर येथून आणलेला राडारोडा तातडीने हटविण्याचे आदेश

# अनाधिकृत राडारोडा टाकणाऱ्या खाजगी विकासकाला दंड

## मधूकोश सोसायटीची आयुक्तांकडे तक्रार...

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी

धायरी फाट्याच्या जवळ असणाऱ्या मधुकोष सोसायटीच्या समोर अनधिकृतपणे राडारोडा टाकणाऱ्या खाजगी विकासकाला पुणे महागरपलिकेच्या सिंहगड क्षेत्रीय कार्यालयाने ५००० रुपयांचा दंड ठोठावला असून त्वरीत राडारोडा हटविण्याचे आदेश दिले आहेत.





साधारण दोन महिन्यापूर्वी खाजगी विकासकाने धायरीतील रायकर नगर येथून राडारोडा अनधिकृतपणे आणून टाकला होता. यासंबंधी मधूकोष सोसायटीने देखील यावर आक्षेप नोंदविताना हा राडारोडा उचलण्यात यावा, यासंबंधी थेट आयुक्तांकडे तक्रार केली होती. या तक्रारीची नोंद घेताना सिंहगड क्षेत्रीय कार्यालयात संबंधित खाजगी विकासकाकडे हा राडारोडा उचलण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला, परंतु राडारोडा उचलण्याचे लागणारी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे तांत्रिक कारण विकासकाच्या वतीने पुढे करण्यात आले होते.

### पाणी तुंबण्याच्या शक्यतेने पालिका प्रशासन कामाला

मागील वर्षी झालेल्या पावसाने मधुकोश सोसायटीच्या समोरच्या भागात पाणी साचून स्थानिक नागरिकांची गैरसोय झाली होती. त्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने भूमिगत चेंबरची निर्मिती केली होती. त्याच सगळ्या चेंबरवर विकासकाने राडारोडा टाकल्याने पुन्हा एकदा मागील वर्षीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने पालिकाचे अधिकारी विकासकाला हाताशी धरून हा राडारोडा उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

### झाडांच्या मुळाशी राडारोडा, वृक्षप्रेमी दुखावले

वर्षांपूर्वी काही सेवाभावी संस्थांनी याभागात वृक्षारोपण केले होते. या तीन चार वर्षांच्या सुमारे १०० झाडांना परिसरातील नागरिकांनी पाणी घालून जिवंत ठेवले होते. मात्र, विकासकाने दोन झाडांच्यामध्ये अस्ताव्यस्त राडारोडा टाकताना झाडांच्या होणाऱ्या हाणीकडे दुर्लक्ष केले. विकासकाच्या या गलथान कारभाराने अनेक वृक्षप्रेमी देखील मोठ्या प्रमाणात दुखावले आहेत.

> ‘‘ सातत्याने पालिका प्रशासन संबंधित खाजगी विकासकाकडे पाठपुरावा करत होते. परंतु काही तांत्रिक कारणामुळे विकासक चालढकल करत होता, त्यामुळेच त्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून आगामी दोन तीन दिवसात हे काम पूर्णत्वास जाईल. -प्रदीपआव्हाड,
> **सहाय्यक आयुक्त,**
> सिंहगड क्षेत्रीय कार्यालय

याबाबत महाईन्यूजने सहाय्यक आयुक्त यांच्याशी संवाद साधत ही बाब लक्षात आणून दिली, त्यामुळे तातडीने सहाय्यक आयुक्त प्रदीप आव्हाड यांनी पुढाकार घेताना राडारोडा उचलण्याचे आदेश खाजगी विकासकासह संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सध्या टाकण्यात आलेला राडारोडा हटविण्याचे काम सुरू असून कामात दिरंगाई करण्यासाठी संबंधित खाजगी विकासकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली

# खडकवासला धरण चौपाटीवर होणाऱ्या कोंडीसाठी वाहनतळची मागणी

## हवेली पोलीस प्रशासनचे आयुक्तांना पत्र : प्रशासनाकडून कार्यवाहीची अपेक्षा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सिंहगड-पानशेत रोडवर खडकवासला धरण तिरावरील चौपाटीवर पर्यटकांच्या नेहमीच होणार्या कोंडीवर उपाय शोधण्यासाठी पोलीस प्रशासनाने निर्णायक भूमिका घेतली आहे. हवेली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तेगबीरसिंह संधू यांनी पुणे महानगर पालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहिले असून त्यांचे पार्किंगसाठी वाहनतळ उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. पानशेत हा रहदारीचा रस्ता असून त्यात चौकातून एक रस्ता उत्तमनगर बाजूकडे एक रस्ता खडकवासला बायपास व एक रस्ता खडकवासला गावात व एक रस्ता पानशेतकडे



⏭ पुणे-पानशेत रोडवर धरण चौकात भागात रस्ता अरुंद आहे. खडकवासला ते पानशेतपर्यंत ठीक ठिकाणी रस्त्यावर रस्तादुरूस्तीची कामे व पुलांची कामे सुरू आहेत. तसेच चौपाटी येथे खाद्यपदार्थ विक्री करणारे हातगाडीवाले टपरीवाले असल्याने फिरण्यासाठी आलेले पर्यटक हे रोडवरच वाहने उभी केली जातात. पर्यटनासाठी येणारे लोकांचे वाहनांसाठी खडकवासला धरण परिसरात पार्किंगची सोय होणे अत्यंत गरजेचे आहे.

जातो. रोडलगत खडकवासला चौपाटी, खडकवासला लव्ह पॉइंट, सिंहगड किल्ला, पानशेत बाजूकडे पानशेत, वरसगाव धरण असे पर्यटन स्थळे आहेत.

धरण चौक सतत वर्दळ व वाहतुकीचा आहे. खडकवासलापासून पुणे, वेल्हा तालुक्यातील ४० ते ४५ व हवेली पोलिस स्टेशनची १२ लहान-मोठी गावे असल्याने स्थानिक लोक बाजार, व्यावसायिक, व्यापारासाठी व सरकारी निमसरकारी व इतर कामे करण्याकरिता पुणे शहरात ये-जा करत असतात. पर्यटन स्थळांमध्ये पोलिस स्टेशनच्या हद्दीत बरीच लहान-मोठी हॉटेल, फार्महाउस आहेत.

पुणे-पानशेत रोडवर धरण चौकात भागात रस्ता अरुंद आहे. खडकवासला ते पानशेतपर्यंत ठीक ठिकाणी रस्त्यावर रस्तादुरूस्तीची कामे व पुलांची कामे सुरू आहेत. तसेच चौपाटी येथे खाद्यपदार्थ विक्री करणारे हातगाडीवाले टपरीवाले असल्याने फिरण्यासाठी आलेले पर्यटक हे रोडवरच वाहने उभी केली जातात. पर्यटनासाठी येणारे लोकांचे वाहनांसाठी खडकवासला धरण परिसरात पार्किंगची सोय होणे अत्यंत गरजेचे आहे.

### महापालिका आयुक्तांनी कार्यवाही करावी : तेगबीरसिंह संधू

पर्यटकांसाठी खडकवासला गावचे जवळपास पार्किंग होणे आवश्यक आहे. खडकवासला धरण चौपाटी भागात फिरण्यासाठी येणारे पर्यटक त्यांच्याकरिता चौपाटी परिसरात वाहनतळ नसल्याने येणारे पर्यटनासाठी वाहनतळ उपलब्ध झाल्यास वाहतूक कोंडी न होता व रोडला उभ्या केलेल्या वाहनांची ही अडथळा न होता वाहातुक सुरळीत चालु शकते. महापालिका हद्दीत शासकीय कोणतीही जास्तीत जास्त मोठी जागा उपलब्ध करून सदर ठिकाणी पर्यटकांसाठी वाहनतळ उभारण्यासाठी पुढील योग्य ती कार्यवाही सुरू करण्यास तेगबीरसिंह संधू यांनी पुणे महानगर पालिकेच्या आयुक्तांकडे मागणी केली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मजुराचा मृत्यू, बिल्डरवर गुन्हा



।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज ।प्रतिनिधी ।

इमारतीचे पाया भरण्याचे काम सुरु असताना ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका मजुराच्या मृत्युस कारणीभुत ठरल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना किवळे येथे शनिवारी (दि. 11) घडली होती.

रंगनाथ भोजगूड असे गुन्हा दाखल झालेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. संदीप कोलाय बन्सिंग (वय 20, रा. झारखंड) असे मृत्युमुखी पडलेल्या मजुराचे नाव आहे. तर, बुद्धेश्वर, करण दिघी आणि मंगल दिघी हे तीन मजुर जखमी झाले.

आरोपी भोजगूड याची किवळे येथे माऊली कन्स्ट्रक्शन या नावाने बांधकाम व्यवसाय आहे. त्यांचा सीटी वन स्काय या बांधकाम प्रकल्पाचे काम सध्या सुरू आहे.

### युवक काँग्रेसने पांडुरंगाला घातले साकडे...

# पंतप्रधान आणि केंद्र सरकारला सद्बुद्धी दे!

### कौस्तुभ नवलेंसह कार्यकर्त्यांचा पुढाकार

।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

हे पांडुरंगा देशात सर्वधर्मसमभावाचे आचरण करण्यासाठी तसेच या देशात सर्व धर्मियांना सुखासमाधानाने जगण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होऊ दे. देशातील महागाई तसेच बेरोजगारी कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारला धोरण राबवण्याची सद्बुद्धी दे असे साकडे पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष कौस्तुभ नवले यांनी पांडुरंगाला घातले.

मंगळवारी (दि. १४ जून) पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देहू येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराचे लोकार्पण सोहळ्यासाठी आले होते. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या वतीने खराळवाडी, पिंपरी, पुणे येथील श्री विठ्ठल रुक्माई मंदिरात युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष कौस्तुभ नवले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पांडुरंगाला साकडे घातले.



जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा अभंग सादर करीत हरिनामाचा गजर केला. कौस्तुभ नवले यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कौस्तुभ नवले म्हणाले की, हे पांडुरंगा देशात बेरोजगारी आणि गुन्हेगारी वाढत आहे. देशात सर्व धर्म समभावाचे आचरण करण्यासाठी, सर्वांना सुखासमाधानाने जगण्यासाठी वातावरण निर्माण होऊ दे. तसेच देशात मुबलक पाऊस होऊन बळीराजा सुखी सुखी होऊ दे. हे पांडुरंगा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य धोरणे आखण्याची सद्बुद्धी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारला दे अशी विनवणी पांडुरंग चरणी करण्यात आली.

यावेळी पिंपरी चिंचवड शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सायली नढे, एनएसयूआयचे प्रदेश उपाध्यक्ष उमेश खंदारे, सेवादलाचे शहराध्यक्ष वीरेंद्र गायकवाड, चिंचवड विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष माऊली मलशेट्टी, युवक काँग्रेसचे शहर सरचिटणीस सौरभ शिंदे, युवक उपाध्यक्ष स्वप्निल बनसोडे, तसेच जेवियर अँथोनी, शंकर ढोरे, अर्णव कामथे, तेजस पाटील, स्वप्निल बनसोडे, सत्यम मण्डल, रोहन मडीकर, अमर पांडे, किरण नढे, संतोष नांगरे, दत्ता पवार, सचिन कदम आदी उपस्थित होते.

यावेळी सौरभ शिंदे यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा अभंग सादर करीत हरिनामाचा गजर केला. कौस्तुभ नवले यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कौस्तुभ नवले म्हणाले की, हे पांडुरंगा देशात बेरोजगारी आणि गुन्हेगारी वाढत आहे. देशात सर्व धर्म समभावाचे आचरण करण्यासाठी, सर्वांना सुखासमाधानाने जगण्यासाठी वातावरण निर्माण होऊ दे. तसेच देशात मुबलक पाऊस होऊन बळीराजा सुखी सुखी होऊ दे. हे पांडुरंगा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य धोरणे आखण्याची सद्बुद्धी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारला दे अशी विनवणी पांडुरंग चरणी करण्यात आली.

तसेच महिला शहराध्यक्ष सायली नढे यांनी रोज होणाऱ्या इंधन दरवाढीमुळे गॅसचे दर वाढत आहेत. त्यामुळे महिला भगिनींना कुटुंबाचा चरितार्थ चालवणे अवघड होत आहे. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारला सद्बुद्धी दे असे साकडे महिलांच्या वतीने महिला शहराध्यक्ष सायली नढे यांनी घातले.

# आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी अंतिम आरक्षण सोडत

## एकूण 273 हरकती निकाली : महापालिका आयुक्त राजेश पाटील यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने काढलेले अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) आणि सर्वसाधारण (महिला) यांच्याकरितेचे अंतिम आरक्षण सोमवारी (दि. १३) राजपत्रात प्रसिद्ध केले. दरम्यान, आरक्षण सोडतीवर आलेल्या २७३ हरकती आयुक्तांनी निकाली काढल्या आहेत.

महापालिका प्रशासनाने ३१ मे रोजी ओबीसी आरक्षणाविना महिलांसाठीची आरक्षण सोडत काढली. पिंपरी महापालिकेत १३९ जागा असून यामध्ये ७० महिला आणि ६९ पुरूषांसाठी जागा राखीव आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी (एससी) २२ जागा राखीव आहेत. त्यात महिलांसाठी १९, ४१, २०, १८, ३७, ४३, ३४, २४, ३५, ११, १४ अशा ११ महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. तर, २, १६, १७, १८, २२, २५, २९, ३२, ३७, ३८, ३९, ४४, ४६ या ११ जागा एससी पुरुष, महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जमाती (एसटी) महिलासाठी ४४, ४१ राखीव झाली आहे. तर, प्रभाग ६ मधून एसटी समाजातील पुरुष, महिलेला लढता येईल. तर, सर्वसाधारण (PCMC Election 2022) महिलांसाठी ५७ जागा आहेत. त्यातील ४५ जागा थेट पद्धतीने राखीव झाल्या आहेत.



महापालिका प्रशासनाने ३१ मे रोजी ओबीसी आरक्षणाविना महिलांसाठीची आरक्षण सोडत काढली. पिंपरी महापालिकेत १३९ जागा असून यामध्ये ७० महिला आणि ६९ पुरूषांसाठी जागा राखीव आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी (एससी) २२ जागा राखीव आहेत. त्यात महिलांसाठी १९, ४१, २०, १८, ३७, ४३, ३४, २४, ३५, ११, १४ अशा ११ महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. तर, २, १६, १७, १८, २२, २५, २९, ३२, ३७, ३८, ३९, ४४, ४६ या ११ जागा एससी पुरुष, महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जमाती (एसटी) महिलासाठी ४४, ४१ राखीव झाली आहे. तर, प्रभाग ६ मधून एसटी समाजातील पुरुष, महिलेला लढता येईल. तर, सर्वसाधारण (PCMC Election 2022) महिलांसाठी ५७ जागा आहेत. त्यातील ४५ जागा थेट पद्धतीने राखीव झाल्या आहेत.

### अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ म्हणतात...

अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ म्हणाले, 'आरक्षण सोडत पद्धतीवर एकही हरकत नव्हती. प्रभागातील आरक्षण बदलावर हरकती होत्या. ते बदल आयोगाने केले आहेत. त्यामुळे २७३ हरकती निकाली काढण्यात आला. अंतिम आरक्षण सोडत राजपत्रात प्रसिद्ध केली आहे'.

प्रभाग क्रमांक ४६ मध्ये थेटपद्धतीने एक जागा सर्वसाधारण महिलेसाठी राखीव केली. त्यामुळे १२ प्रभागासाठी सोडत काढण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण महिलेसाठी ४०, १२, ३६, ७, २१, १३, १, ४२, ८, ३१, २७, ३० हे प्रभाग राखीव झाले. तर उर्वरित प्रभाग हे पुरूषांसाठी राखीव झाले आहेत. प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत १ ते ६ जून दरम्यान नागरिकांकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या.

या मुदतीत आरक्षण सोडतीवर २७३ हरकती आल्या होत्या. त्यात प्रभाग क्रमांक २ चिखली गावठाण-मोरेवस्ती-कुदळवाडीतील एससीच्या आरक्षणावर आणि प्रभाग क्रमांक ५ चऱ्होली-चोविसावाडी-वडमुखवाडीतील एसटी आरक्षणा बदलावर सर्वाधिक हरकती आहेत. या दोन प्रभागाबाबत २६९ हरकती एकाच व्यक्तीने दिल्या होत्या. हरकती एकसारख्याच आहेत. या दोनही प्रभागातील आरक्षण राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या पातळीवर बदलले असल्याचे सूत्रांनी सांगितले.

प्रभाग क्रमांक ३४ ३५, ४३, ११ याबाबत देखील हरकती आल्या होत्या. या हरकती निकाली काढण्यात आली. आरक्षण निश्चितीबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर विचार करुन प्रभागनिहाय अंतिम आरक्षण आज १३ जून रोजी शासन राजपत्रात

## संपादकीय »

# सुखी नागरिकांचा समाधानी समाज'

***भारतातील महिलांच्या स्थितीविषयी वेगळे सांगायला नको. मुलींना गर्भातून बाहेरच येऊ न देण्यापासून त्यांना अर्धपोटी ठेवण्यापर्यंत सर्व प्रकारचा छळ होतो. मराठवाड्यात गर्भातील मुलींच्या आणि आयांच्या जिवावर उठलेल्यांची बातमी तर अगदी परवाचीच आहे. इतकी प्रतिकूल स्थिती असूनही देशातल्या प्रगत आणि अविकसित अशा जवळपास सर्वच राज्यांमध्ये महिलांचे सरासरी आयुर्मान पुरुषांपेक्षा जास्त आहे.***

महिलांमधील चिवटपणा, परिस्थितीशी दोन हात करण्याची जिद्द आणि प्रतिकूल स्थितीतही अस्तित्व टिकवून ठेवण्याची जिजीविषा, यांचे प्रतिबिंब या आकडेवारीत पडले आहे. ते सुखावणारे आहे. पुरुषांनी भारतीय मुली आणि महिलांचे आकाश आणखी थोडे जरी मोकळे केले, तरी ही आकडेवारी प्रगत व विकसित देशांच्या बरोबरीने झाल्याशिवाय राहणार नाही. महिलांचे आरोग्य आणि आयुर्मान सुधारले, तर शेवटी त्याचा फायदा पुरुषांनाही होऊन, एकूणच समाजाचे आयुर्मान आणखी पुढे जाईल, असा विश्वास देणारी ही आकडेवारी आहे. काही दिवसांपूर्वीच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, भारताची लोकसंख्या हळूहळू स्थिर होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. याचाच अर्थ, प्रतिदाम्पत्य जन्माला येणाऱ्या मुलांची संख्या कमी होत आहे. भारतातील महिलांचे आयुर्मान वाढण्यात याही घटकाचा मोठा वाटा आहे. याचे कारण, अनेक बाळंतपणे आणि तीही असुरक्षित, अनारोग्यकारी वातावरणातील हा भारतीय महिलांना मिळालेला एक शाप होता. तो आता दूर होतो आहे.

जन्माच्या क्षणी सरासरी आयुर्मर्यादा मोजण्याचीही पद्धत असते. यातून मुख्यत: शून्य ते पाच या वयोगटातील अर्भकांचे मृत्यू रोखण्यात कितपत यश आले आहे, यावर प्रकाश पडतो. यातही भारताने उत्तम नसली, तरी चांगली कामगिरी केली आहे. सन १९७० ते ७५ या काळात ही टक्केवारी अवघी ५० होती. ती आता सत्तरच्या आसपास पोहोचली आहे; मात्र इतर विकसित देशांच्या तुलनेत भारताला बालमृत्यू रोखण्याबाबत अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. तसा तो गाठला गेल्यास एकूण सरासरी आयुर्मान आणि जन्मावेळचे सरासरी आयुर्मान यांच्यातील फरक कमी होऊ शकेल. आयुर्मान वाढले, याचा अर्थ भारतीय समाज सुखी आणि समाधानी झाला आहे का, या प्रश्नाचे ठोस उत्तर मात्र देता येणार नाही. ज्येष्ठांचे लांबलेले आयुष्य सुखी, समाधानी, निरोगी आणि अर्थपूर्ण होते आहे का, असा प्रश्न विचारावा लागेल. या प्रश्नातूनच भूतान या भारताच्या चिमुकल्या शेजाऱ्याने ५० वर्षांपूर्वी सर्वप्रथम 'सुखांक' ही कल्पना मांडली.



## आनंदी सकाळ

# विकारांना वश न होता, प्रारब्धाने आलेले विषय भोगावे

दरवाजे, खिडक्या, हे जसे घराचे साधन आहे किंवा आपल्या गावी जाण्यासाठी आगगाडी हे जसे साधन आहे, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी किंवा परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रपंच हे साधन आहे. नाहीतर नुसत्या प्रपंचामध्ये सुख नाही. प्रपंच हा इथून तिथून सगळा सारखाच. गरीबाचा असो की अडाण्याचा असो, अधिकाऱ्याचा असो की कारकुनाचा असो, या देशातला असो की त्या देशातला असो, प्रपंचाचा धर्म जो उणेपणा, अपुरेपणा किंवा तात्पुरतेपणा, तो कधीही कुठेही बदलत नाही. म्हणून जे आपल्यापाशी नाही ते ज्याच्यापाशी आहे त्याच्या प्रपंचाला पाहून आपण भुलून जाऊ नये. आहे त्यात समाधान ठेवावे. परमार्थात अधिकार कुणी कुणाला देऊन येत नसतो; आपला अधिकार आपल्या कृतीवर अवलंबून असतो.

# नावाला "उत्तम", नगरात मात्र पाण्याची बोंबाबोंब!



भूमिका

- गौरव जाधव



काखेत कळसा अन गावाला वळसा... अशी अवस्था खडकवासला परिसरातील गावांची झाली आहे. बघा ना खडकवासला धरण जे आख्ख्या पुण्याला पाणी पुरवते. मात्र परिसरातील गावे पाण्यासाठी वणवण करत आहेत. हीच खरी शोकांतिका आहे. व्यवस्थेची आणि नेते इथल्या मंडळींच्या उदासिनतेची...उत्तमनगर गाव अगदी खडकवासला धरणाला लागूनच... जेमतेम 2 किलोमीटरचे अंतर असेल... हे खडकवासला धरण जे अख्ख्या पुण्याला पाणी पुरवठा करते... पण या धरणाच्या शेजारी असलेली गावे मात्र पाण्यासाठी वणवण करताना दिसतात... उत्तमनगर गावात मी 2 वर्षे झाली राहतोय... संध्याकाळी 6.30 ते 8 पर्यंत पाणी येते... पण त्या पाण्याची धार करंगळी पेक्षा ही लहान आहे... एक हंडा भरायला गेलो तर अर्धा अर्धा तास वेळ लागतो... अशा वेळेत एक आख्खी इमारत त्यामधील राहणारे लोकं कधी पाणी भरणार आणि कधी त्यांना पाणी मिळणार... मागील 2 वर्षात मी खूप लोकांना इथून घरे सोडून जाताना पाहिले आहे... एकीकडे प्रशासन मुलभूत सोयीसुविधांपासून लोकांना वंचित ठेवत आहे. या पेक्षा दुर्दैव ते आणखी काय... अजून तिथे रस्ता म्हणजे डांबरीकरण सुद्धा अजून झाले नाही... महानगरपालिका प्रशासन का याकडे लक्ष देत नाही... का अजून धरणाच्या कडेला राहून ही पिण्याला पाणी मिळत नाही... चंद्रावर जायला रस्ता बांधतील पण मग् इथे अजून रस्ता का होतं नाही... कधी हे प्रश्न सुटतील... कधी या लोकांना त्यांच्या मुलभूत गरजा मिळतील... कधी हे लोकं सुखी होतील. खडकवासला धरणातून पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यात येतो. पुणे शहराला सतत पाणीपुरवठा करावा लागत असल्याने खडकवासला धरणाचे कालवे दुरुस्त करणे अशक्य आहे. त्यामुळे कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होते. यापूर्वी ३००० मिलिमीटर व्यास असलेली लोखंडाची पाईपलाईन उभारण्यात आली होती. मात्र, शहराची पाण्याची गरज वाढत असल्याने कालव्याद्वारेही पाणी पोहोचविण्याची गरज भासली. त्यामुळे वर्ष २०५० पर्यंतच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन पाईपलाईन उभारली गेली आहे. मात्र तरीही आजूबाजूच्या गावांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

# कल्याणकारी राज्याच्या गप्पा

**राज्यात नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर तरी सगळे काही केवळ मतांसाठी करण्याची भावना बाजूला ठेवण्याची मानसिकता राज्यकर्त्यांनी दाखवायला हवी. प्रत्येक गोष्टीत निव्वळ स्वार्थच बघायचा ठरला, तर कल्याणकारी राज्याच्या नुसत्या गप्पाच मारल्या जातील, प्रत्यक्षात हातात काहीच येणार नाही... जून महिना आला, की पावसाची चर्चा सुरू होते. मान्सून नक्की कधी येणार,**

यंदा पुरेसा पाऊस होणार की नाही याची. वेधशाळेचे अंदाज, त्यात होणाऱ्या चुका, त्यावर केली जाणारी चेष्टा हा सगळा नित्यक्रम आहे. उन्हाने भाजून निघाल्यानंतर ही चर्चा होत नाही, असे घर महाराष्ट्रात नसेल. अर्थात, गेल्या काही वर्षांत पावसाच्या बरसण्यात आणि त्याचे अंदाज वर्तविण्यातही लक्षणीय सुधारणा झाली आहे. शहरी किंवा ग्रामीण भागांमध्ये पुढच्या चोवीस तासांत पाऊस होईल किंवा नाही; याचबरोबर तो किती होईल, येथपर्यंतची मजल विज्ञान व तंत्रज्ञानाने मारली आहे; त्यामुळे आपण सजग होऊन काही प्रमाणात आपली काळजी घ्यायला लागलो आहे. मुख्य अडचण आहे, ती या पावसामुळे येणाऱ्या अडचणींमध्ये तारणारी शासन व्यवस्था किती सज्ज असते त्याची.



गेली काही वर्षे पर्यावरणातील बदलांमुळे ढगफुटी किंवा एकाच दिवशी खूप पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे समुद्रात होणाऱ्या चक्रीवादळांची संख्याही वाढली आहे; त्यामुळे किनापपट्टीवर होणारा पाऊस, त्यातून होणारे नुकसान या सगळ्यांचाच फटका आपल्याला बसतो आहे. दुर्दैव असे, की हे सगळे कळत असूनही आपण त्यासाठी सज्ज होत नाही, पुरेशी तयारी करत नाही. महाराष्ट्रामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर व सांगली हे दोन जिल्हे आणि मुंबईचा परिसर हे या पावसामुळे होत असलेल्या नुकसानाचा मोठा फटका खात असल्याचे चित्र गेल्या काही वर्षांमध्ये तयार झाले आहे. त्याचप्रमाणे विदर्भामध्येही अशाच पद्धतीने अचानक पडणाऱ्या भरपूर पावसाने होणारे नुकसान नोंदविले जात आहे. वास्तविक, राज्य सरकारने एखादा कृतिगट नियुक्त करून, याचा अभ्यास करण्यासाठी यंत्रणा उभी करणे अपेक्षित आहे; पण तसे होताना दिसत नाही. या पावसाच्या अगोदरही आपण तयारी केली आहे ती 'एनडीआरएफ'ची पथके सज्ज ठेवण्याची आणि नुकसान झाल्यास मदतकार्य करण्याची. हे पुरेसे नाही. यामध्ये ओडिशासारख्या राज्याचा आदर्श घेण्यासारखा आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक वेळा चक्रीवादळाचा फटका बसलेले राज्य म्हणून ओडिशाची ओळख आहे. या वादळात मालमत्तेबरोबरच जीवहानी होण्याचेही प्रमाणे मोठे होते; पण गेल्या दहा वर्षांत त्यांनी आपत्ती व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करून, सक्षम व वेळेवर प्रतिसाद देणारी यंत्रणा उभी केली.

## ।। अभंगवाणी ।।



मरणाही आधीं राहिलों मरोनी ।
मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल ।
नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### केवळ आडनावावरून जात ओळखणे चुकीचे ? - भुजबळांनी



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनस्थापित करण्यासाठी ओबीसींची सांख्यिकी माहिती जमा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाकडून आडनावावरून जातीची नोंद करण्यास केली जात असल्याची तक्रार आहे. त्यावर अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. केवळ आडनावावरून जात ओळखणे चुकीचे आहे, अशा शब्दात त्यांनी आयोगाला फटकारले आहे. राज्यातील ओबीसींची सांख्यिकी माहिती जमा करून अहवाल सादर करण्यासाठी माजी मुख्य सचिव जयंत बांठिया यांच्या अध्यक्षतेकाली समर्पित आयोग स्थापन केला आहे. मात्र काही ठिकाणी आडनावावरून जात गृहीत धरली जात असल्याची बाब समोर येत आहेत. अशी पद्धत चुकीचे असून यात सर्वपक्षीयांनी लक्ष घालण्याची गरज असल्याचे

## दुसरा उमेदवार मागे घेण्यास काँग्रेसचा नकार

# आता विधान परिषदेसाठी चुरस!

### सदाभाऊ खोतांची माघार

। मुंबई महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभेतील पराभव आणि भाजपने सहावा उमेदवार मागे घेतल्याने विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध करावी, असा शिवसेना आणि राष्ट्रवादीत सूर असताना काँग्रेस दोन जागा लढण्यावर ठाम राहिल्याने निवडणूक अटळ ठरली आहे. त्यामुळे पुन्हा आमदारांचा 'भाव' वाढणार आहे. दहाव्या जागेसाठी आता भाजप आणि काँग्रेसमध्ये चुरस आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारीची मुदत सोमवारी दुपापर्यंत होती. निवडणूक बिनविरोध व्हावी, या दृष्टीने महाविकास आघाडी आणि भाजप नेत्यांमध्ये अनौपचारिक चर्चाही झाली होती. पाच जागा मिळणार असल्यास निवडणूक बिनविरोध करण्यास भाजपचीही तयारी होती. भाजपच्या पाठिंब्यावर अपक्ष म्हणून उमेदवार अर्ज दाखल केलेले सदाशिव खोत यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. निवडणूक बिनविरोध व्हावी, असा शिवसेना आणि राष्ट्रवादीचा प्रयत्न होता. अजित पवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, एकनाथ शिंदे, अनिल परब, अनिल देसाई या महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली.



काँग्रेसने दुसरा उमेदवार मागे घ्यावा, असे सुचविण्यात आले. पण, दोन जागा लढण्यावर काँग्रेसने ठाम भूमिका घेतली. परिणामी निवडणूक बिनविरोध होऊ शकली नाही.

राज्यसभा निवडणुकीतील पराभवामुळे महाविकास आघाडीची नाचक्की झाली. सहावी जागा लढविण्यासाठी पुरेशी मते आहेत का, यावर आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीत खल झाला. काँग्रेसचे दुसरे उमेदवार भाई जगताप यांनी माघार घेण्यास ठाम नकार दिला. काँग्रेसचे ४४ आमदार आहेत. विजयासाठी पहिल्या पसंतीच्या २६ मतांची आवश्यकता आहे. गुप्त मतदान असल्याने कोटय़ापेक्षा दोन तरी अधिक मते पहिले उमेदवार चंद्रकांत हंडोरे यांना द्यावी लागतील. १६ अतिरिक्त मते काँग्रेसकडे असली तरी अन्य १० मतांची व्यवस्था करावी लागेल. शिवसेना व राष्ट्रवादीकडे अतिरिक्त मते शिल्लक नाहीत. याशिवाय दोन्ही पक्ष दुसऱ्या पसंतीची मते आपल्या दुसऱ्या उमेदवारांना देणार आहेत. यामुळेच बाहेरून दहा मते भाई जगताप यांना मिळवावी लागतील. एवढ्या मतांची खात्री आहे का, असा सवाल आघाडीच्या बैठकीत करण्यात आला तेव्हा तेवढी मते नक्कीच मिळवून विजयी होऊ, असा विश्वास जगताप यांनी व्यक्त केला. भाजपला अतिरिक्त का जागा सोडायची, असा सवाल काँग्रेसने केला.

> काँग्रेसचे दोन उमेदवार निवडून येऊ शकतात. त्यामुळेच पक्ष दोन जागा लढवीत असून, दोन्ही जागा जिंकू.
> – बाळासाहेब थोरात, महसूलमंत्री व काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते

### उमेदवार

- रामराजे नाईक-निंबाळकर व एकनाथ खडसे (राष्ट्रवादी)
- विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, राम शिंदे, उमा खापरे, श्रीकांत भारतीय, प्रसाद लाड (भाजप)
- सचिन अहिर व आमशा पाडवी (शिवसेना)
- चंद्रकांत हंडोरे व भाई जगताप (काँग्रेस)

### भाजपकडेही कमी मते

भाजपला पाचवी जागा निवडून आणण्यासाठी मेहनत घ्यावी लागेल. पाच जागा निवडून आणण्यासाठी १३० मतांची आवश्यकता आहे. राज्यसभा निवडणुकीत भाजपला पहिल्या पसंतीची १२३ मते मिळाली. गुप्त मतदान पद्धतीमुळे बाहेरून तेवढी मते मिळू शकतात, असे भाजप नेत्यांचे गणित आहे. गुप्त मतदानामुळे राजकीय पक्षांची मतेही मिळण्याचा मार्ग मोकळा आहे. भाजपचे १०६ आमदार असून, आठ आमदारांचा पाठिंबा आहे. पक्षाला पाचव्या जागेसाठी १६ मतांची गरज असेल. काँग्रेसपेक्षा भाजपला अधिक मतांची आवश्यकता आहे. सहाही जागा निवडून आणू, असा निर्धार विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्यसभेच्या विजयानंतर केला होता. पण, सहाव्या जागेचे गणित जमणे अशक्य असल्याने पक्षाने पाच अधिकृत उमदेवार रिंगणात ठेवून, पुरस्कृत केलेले सहावे उमेदवार सदा खोत यांचा अर्ज मागे घेतला.

### जगताप विरुद्ध लाड दुसऱ्यांदा लढत

विधान परिषदेच्या मुंबई स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात २०१६ मध्ये दुसऱ्या जागेसाठी काँग्रेसचे भाई जगताप आणि भाजप पुरस्कृत प्रसाद लाड यांच्यात चुरशीची लढत झाली होती. त्या लढतीत जगताप यांनी लाड यांना पराभूत केले होते.

या वेळी दहाव्या जागेसाठी जगताप आणि लाड यांच्यात लढत होत असून, गेल्या निकालाची पुनरावृत्ती होते की लाड जुने हिशेब चुकते करतात, याची उत्सुकता असेल.

---

# लोकार्पणापूर्वीच समृद्धी महामार्ग ठरतोय जीवघेणा!

### दोन अपघातांमध्ये तिघांनी गमावला प्राण, कार चक्काचूर

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

समृद्धी महामार्गावर लोकार्पणापूर्वीच धोकादायक वाहतूक सुरू आहे. त्यामुळे हा महामार्ग जीवघेणा ठरत आहे. बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आतापर्यंत झालेल्या दोन अपघातात तिघांना आपला जीव गमवावा लागला.

या महामार्गाचे काही टप्प्यातील काम पूर्ण झाले. मात्र, अद्याप त्याचे लोकार्पण करण्यात आलेले नाही. लोकार्पणाचा कार्यक्रम दोन वेळा स्थगित करून पुढे ढकलण्यात आला. निकृष्ट कामावरूनसुद्धा समृद्धी महामार्ग चर्चेत आहे.



मेहकर येथील काही व्यावसायिक औरंगाबाद येथून समृद्धी महामार्गावरून परत येत असताना त्यांच्या वाहनाला अपघात झाला. मुसळधार पाऊस सुरू झाल्याने तांदुळवाडी शिवारात चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन महामार्गावरील दुभाजकाला आदळले आणि खड्ड्यात पडले. या भीषण अपघातात व्यावसायिक बळीराम खोकले यांचा मृत्यू, तर दोन जण गंभीर जखमी झाले.

अपघातात कार अक्षरश: चक्काचूर झाली. यापूर्वी देखील

### पंतप्रधान मोदींच्या सराकारी नोकरी संदर्भातील निर्णयावर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनापासून स्वागत करते - सुप्रिया सुळे

### अमरावती येथील अंबादेवी मंदिरात दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी साधला संवाद

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभा निवडणुकीदरम्यान शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी काही अपक्ष आमदारांची नावे घेऊन दगाफटका केल्याचा आरोप केला, त्यावर राष्ट्रवादीचे नेते नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या चर्चेत काहीच तथ्य नाही. संजय राऊत आणि अपक्ष आमदार देवेंद्र भुयार यांची नुकतीच



भेट झाली. राऊत यांच्याबाबत आमची कुठलीही नाराजी नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सरकारी नोकऱ्या देण्यासंदर्भात केलेल्या घोषणेचं स्वागतही केलं.

संजय राऊत आणि अपक्ष आमदार देवेंद्र भुयार यांची नुकतीच भेट झाली. राऊत यांच्याबाबत आमची कुठलीही नाराजी नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सरकारी नोकऱ्या देण्यासंदर्भात केलेल्या घोषणेचं स्वागतही केलं.

## शॉर्ट न्यूज »

### जम्मू काश्मीरमध्ये दोन दहशतवादी ठार



। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जम्मू काश्मीरमध्ये सुरु असलेल्या टार्गेटेड किलिंगमुळे येथे सध्या तणावाचे वातवरण आहे. असे असताना आता श्रीनगरमधील बेमिना भागात दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आलं. मिळालेल्या माहितीनुसार येत्या ३० जूनपासून सुरु होणाऱ्या अमरनाथ यात्रेवर हल्ला करण्याचा या दहशतवाद्यांचा कट होता. मात्र श्रीनगरमधील बेमिना भागात पोलिसांनी त्यांना ठार ठार केले. हे दहशतवादी लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेशी संबंधित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० जूनपासून सुरु होणाऱ्या अमरनाथ यात्रेवर हल्ला करण्याच्या उद्देशाने पाकिस्तानमधून दोन दहशतवादी आले होते.

# “...म्हणून आपले पंतप्रधान खऱ्या अर्थाने वारकरी”!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या देहू दौऱ्यात फडणवीसांचे उद्गार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देहू दौऱ्यावर आहेत. मोदी यांनी नुकतंच तुकोबारायांचं दर्शन घेऊन व्यासपीठावर दाखल झाले आहेत. यावेळी व्यासपीठावरून आपलं मनोगत व्यक्त करताना देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहे. आपले पंतप्रधान हे खऱ्या अर्थाने वारकरी आहेत, असं त्यांनी आपल्या भाषणात म्हटलं आहे.

“तुकाराम महाराजांच्या शब्दांच्या धनात इतकी ताकद होती, की ते शब्द कुणी मिटवू शकले नाहीत. इंद्रायणीत बुडवा किंवा शिळेनं बंद करा. पण ते तुकोबारायांचे शब्द होते, ते शब्द पुन्हा वर आले. त्या शब्दांनी जनाजनाला व्यापून घेतलं. त्यांनी जो मार्ग दाखवला होता त्या मार्गावर चालण्याचं काम



आपले पंतप्रधान करत आहेत,” असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

‘जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा’ हाच मंत्र पंतप्रधान मोदी यांनी स्वीकारला आणि गरीब कल्याणाची मोहीम हाती घेत रंजल्या गांजल्यांसाठी काम करत आहेत. म्हणून आपले पंतप्रधान खऱ्या अर्थाने वारकरी आहेत, अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी मोदींच्या कामाचं कौतुक केलं आहे.

त्यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटलं की, “वारकऱ्यांमध्ये कुणी मोठं नसतं, कुणी छोटं नसतं, सगळे वारकरी सेवक असतात, आपले पंतप्रधान ‘प्रधानसेवक’ आहेत. त्यामुळे सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास हेच तर वारकरी संप्रदाय सर्वांना सांगतो. तेच काम मोदी करत आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण जगासाठी जे पसायदान मागितलं, संपूर्ण जग आपलं आहे, हा संदेश दिला. नरेंद्र मोदी यांनी देखील करोना काळात

> “तुकाराम महाराजांच्या शब्दांच्या धनात इतकी ताकद होती, की ते शब्द कुणी मिटवू शकले नाहीत. इंद्रायणीत बुडवा किंवा शिळेनं बंद करा. पण ते तुकोबारायांचे शब्द होते, ते शब्द पुन्हा वर आले. त्या शब्दांनी जनाजनाला व्यापून घेतलं. त्यांनी जो मार्ग दाखवला होता त्या मार्गावर चालण्याचं काम आपले पंतप्रधान करत आहेत,” असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

# ‘अग्निपथ योजने’ची संरक्षण मंत्र्याकडून घोषणा

*तरुणांना मिळणार तिन्ही सैन्य दलात सेवेची संधी*



। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण दलांसाठी अग्निपथ भरती योजनेची घोषणा केली आहे. या अंतर्गत भारताच्या तिन्ही सैन्यात चार वर्षांसाठी तरुणांची भरती केली जाणार आहे, ज्याला ‘टूर ऑफ ड्यूटी’ असे नाव देण्यात आले आहे. दोन आठवड्यांपूर्वी नौदल, लष्कर आणि हवाई दलाच्या प्रमुखांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अग्निपथ योजनेची माहिती दिली होती. लष्करी व्यवहार विभाग त्याची अंमलबजावणी करत आहे. चार वर्षांनंतर, या योजनेंतर्गत भरती झालेल्या ८० टक्के तरुणांची सेवा समाप्त केली जाणार आहे. उरलेल्या २० टक्के सैनिकांना तिन्ही सेना दलात काम करण्याच पुन्हा संधी मिळणार आहे.

“सुरक्षाविषयक कॅबिनेट समितीने आज ऐतिहासिक निर्णय घेऊन ‘अग्निपथ’ या परिवर्तनीय योजनेला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत भारतीय तरुणांना सशस्त्र सेवेत सामील होण्याची संधी दिली जाईल,” असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे.

याद्वारे भारतीय तरुणांना ‘अग्नवीर’ म्हणून सेवा करण्याची संधी मिळणार आहे. यामुळे देशाची सुरक्षा मजबूत होईल आणि तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही राजनाथ सिंह म्हणाले. देशातील प्रत्येक तरुणाचे आयुष्यात सैन्य

# राज ठाकरेंना विरोध करणारे बृजभूषण सिंह शरयू नदीवर संजय राऊतांना भेटणार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे उद्या, १५ मे रोजी अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी शिवसेनेचे खासदार संजय राऊत हे आज अयोध्येच्या दिशेने रवाना झाले आहेत. दरम्यान, राज ठाकरे यांना विरोध करणारे खासदार बृजभूषण सिंह आज संजय राऊत यांची शरयू नदीवर भेट घेणार आहेत. त्यामुळे या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा

### राज ठाकरेंना काय धमकी दिली होती?

राज ठाकरे उत्तर भारतीयांची माफी मागत नाहीत तोवर त्यांना अयोध्येत पाऊल ठेवू देणार नाहीत. मनसैनिक अयोध्येत आल्यास त्यांना शरयूत बुडवू अशी गर्जनाही त्यांनी केली होती.

### राज ठाकरेंना विरोध, ठाकरे कुटुंबियांना नाही

माझा विरोध राज ठाकरे यांना आहे. त्यांच्या कुटुंबियांना नाही. त्यामुळे राज यांच्या आई, पत्नी किंवा कुटुंबातील कोणीही अयोध्येत आलं तर मी स्वतः त्यांचं आदरतिथ्य करेन. परंतु राज ठाकरे यांना माझा विरोध कायम आहे. माफी मागत नाही तोपर्यंत राज ठाकरेंना विरोध कायम राहील, असंही बृजभूषण सिंह म्हणाले.

# देशात महागाईचा भडका; घाऊक महागाई दर १५.८८ टक्क्यांवर

## कच्च्या मालाच्या किंमती, वाहतूक खर्चाच्या किंमती वाढल्यामुळे घाऊक महागाई वाढली

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारतात महागाईचा भडका उडाला आहे. किरकोळ महागाईनंतर आता घाऊक महागाईतही मोठी वाढ झाली आहे. एप्रिल महिन्यात महागाईचा दर १५.८ टक्के होता. या महागाईच्या दरात वाढ झाली असून हा टक्का १५. ८८ टक्क्यांवर गेला आहे. गेल्या ९ वर्षातील हा सर्वाधिक महागाई दर मानण्यात येत आहे.

यापूर्वी मार्च महिन्यात घाऊक महागाईचा दर १४.५५ टक्क्यांवर पोहोचला होता. त्याअगोदर फेब्रुवारी महिन्यात हा दर १३.४३ टक्क्यांवरुन १३.११ टक्क्यांवर पोहोचला होता.

घाऊक महागाईचा दर गेल्या



> मार्च महिन्यात घाऊक महागाईचा दर १४.५५ टक्क्यांवर पोहोचला होता. त्याअगोदर फेब्रुवारी महिन्यात हा दर १३.४३ टक्क्यांवरुन १३.११ टक्क्यांवर पोहोचला होता. घाऊक महागाईचा दर गेल्या वर्षी एप्रिल २०२१ मध्ये १०.७४ टक्क्यांवर होता. दरम्यान, एप्रिल २०२१ पासून सलग १३ महिने घाऊक महागाईचा दर दोन आकडी राहिला आहे. प्रामुख्याने खनिज तेल, कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, अन्नपदार्थ, मूलभूत धातू, अ-खाद्य वस्तू, रसायने आणि रासायनिक उत्पादने आणि अन्न उत्पादने इत्यादींच्या किमतींमध्ये वाढ झाल्यामुळे महागाईत वाढ नोंदवण्यात आली होती.

वर्षी एप्रिल २०२१ मध्ये १०.७४ टक्क्यांवर होता. दरम्यान, एप्रिल २०२१ पासून सलग १३ महिने घाऊक महागाईचा दर दोन आकडी राहिला आहे. प्रामुख्याने खनिज तेल, कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, अन्नपदार्थ, मूलभूत धातू, अ-खाद्य वस्तू, रसायने आणि रासायनिक उत्पादने आणि अन्न उत्पादने इत्यादींच्या किमतींमध्ये वाढ झाल्यामुळे महागाईत वाढ नोंदवण्यात आली होती.

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने याबाबत एक निवेदन जाहीर केले आहे. तसेच भाजीपाला, गहू, फळे आणि बटाट्याच्या किंमतीत वर्षभरापूर्वीच्या तुलनेत मोठी वाढ झाली आहे. मे महिन्यात खाद्यपदार्थांची महागाई दर १२.३४ टक्के होती.

# ‘हसता हा सवता’ नवे विनोदी नाटक प्रेक्षकांच्या भेटीला

नवनवीन कलात्मक अनुभूती निर्माण व्हाव्यात व नव्या जाणिवा असलेला प्रेक्षक घडावा या हेतूने आशय–विषयाची नवता घेऊन नवी नाटकं रंगभूमीवर येऊ घातली आहेत. मनोरंजनासोबत विचार करायला प्रवृत्त करणारा असचं एक वेगळ नाटक रंगभूमीवर येऊ घातलं आहे. अभिराम भडकमकर लिखित आणि कुमार सोहोनी दिग्दर्शित ‘हसता हा सवता’ या नव्या विनोदी नाटकाचा शुभारंभ १७ जूनला दु. ४ वा. दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे होणार आहे. मोरया थिएटर्स निर्मित आणि वेदान्त एण्टरटेन्मेंट प्रकाशित या नाटकात प्रियदर्शन जाधव मध्यवर्ती भूमिकेत असून त्याच्यासोबत अमोल बावडेकर, अश्विनी जोशी, श्रद्धा पोखरणकर, प्रसाद दाणी हे कलाकार दिसणार आहेत. या नाटकाची निर्मिती भाऊसाहेब भोईर यांनी केली असून सुत्रधार भैरवनाथ शेरखाने आहेत.

या नाटकाची संकल्पना महात्मा फुले यांच्या एका वाक्यावर आधारलेली आहे. एकमेकांवर ‘मालकी हक्क’ गाजवण्यापेक्षा प्रेम करू असा विचार यात मांडण्यात आला आहे. कौटुंबिक आशय फँटसी पद्धतीने मांडत लेखक अभिराम भडकमकरआणि दिग्दर्शक कुमार सोहोनी ही जोडगोळी ‘हसता हा सवता’ या नाटकातून प्रेक्षकानां काहीतरी वेगळं देणार हे नक्की.


या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे कुमार सोहोनी यांच्या दिगदर्शनाची ४९वर्षे पूर्ण झाली असून ५०व्या वर्षातले हे पहिलेच नाटकआहे. नुकताच सांस्कृतिक विभागाचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. बऱ्याच वर्षानी ते विनोदी नाटकाचे दिग्दर्शन करत आहेत. नाटकाची प्रकाशयोजना ही त्यांचीच आहे. पुरुषोत्तम बेर्डे संगीत देतायेत. नेपथ्य बाबा पार्सेकर यांचे आहे. अभिनेता प्रियदर्शन जाधव याचे २५ वे नाटकं आहे. एकंदरीतच विषयापासून ते सादरीकरणापर्यंत चांगली भट्टी असल्यामुळे ‘हसता हा सवता’ हे नाटक प्रेक्षकांचे दिलखुलास मनोरंजन करेल असा विश्वास नाटकाच्या संपूर्ण टीमने व्यक्त केला आहे.



# संजय लीला भन्साळीच्या ‘हीरामंडी’मध्ये रेखा साकारणार मुख्य भूमिका

**या चित्रपटाची जेव्हापासून अनाउंसमेंट करण्यात आली आहे, तेव्हापासून या चित्रपटाची चर्चा होत आहे. आता अशी बातमी समोर या चित्रपटामध्ये ज्येष्ठ अभिनेत्री रेखाला सुद्धा कास्ट करण्यात येणार आहे**

बॉलिवूडचे सुप्रसिद्धा दिग्दर्शक संजय लीला भंसाळी आपल्या भव्य चित्रपटांमुळे ओळखले जातात. येत्या काळात ते ओटीटी प्लॅटफॉर्मवरील ‘हीरामंडी’ चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. या चित्रपटाची जेव्हापासून अनाउंसमेंट करण्यात आली आहे, तेव्हापासून या चित्रपटाची चर्चा होत आहे. आता या चित्रपटामध्ये ज्येष्ठ अभिनेत्री रेखाला सुद्धा कास्ट करण्यात येणार आहे. त्यामुळे रेखाचे चाहते आता ‘हीरामंडी’ चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्सुक आहेत.



‘हीरामंडी’मध्ये रेखाची भूमिका

सूत्रांच्या माहितीनुसार, संजय लीला भंसाळीचा चित्रपट ‘हीरामंडी’मध्ये रेखाला कास्ट करण्यात आलं आहे. तसेच या चित्रपटात रेखाची मुख्य भूमिका असणार आहे. ‘हीरामंडी’मधील रेखाची भूमिकेला वेगळे लिहिण्यात आलं आहे. तसेच असं म्हणटंल जात आहे की, रेखा आणि संजय लीला भंसाळीला एकमेकांसोबत काम करण्याची खूप इच्छा होती. या दोघांनीही याआधी एकत्र काम केलेले नाही. ‘हीरामंडी’ चित्रपटाच्या माध्यमातून दोघेही पहिल्यांदा एकत्र काम करणार आहेत.


‘हीरामंडी’ चित्रपटाचे बजेट

नेटफ्लिक्सने ‘हीरामंडी’ चित्रपटासाठी २०० करोड रूपयांचे बजेट दिलेले आहे. सूत्रांच्या मते, एक दिग्दर्शक म्हणून संजय लीला भंसाळी जवळपास ६०-६५ कोटी फी वसूल करणार आहेत.तसेच बाकी पैसे चित्रपटाच्या निर्मितीसाठी लागणार असून इतर चित्रपटातील सर्व कलाकारांना दिले जातील.

‘हीरामंडी’चित्रपटाची कथा

‘हीरामंडी’ चित्रपटामध्ये हुमा कुरैशा आणि सोनाक्षी सिन्हा, मनीषा कोइराला आणि ऋचा चड्ढा दिसणार असून चित्रपट ‘हीरामंडी’ची कथा भारत आणि पाकिस्तानच्या विभाजनाच्या दरम्यान वैश्यांनवर झालेल्या अत्याचारावर आधारित असणार आहे.’हीरामंडी’ हा संजय लीला भंसाळींचा खूप जुना प्रोजेक्ट आहे.चित्रपटात प्रेम, विश्वासघात आणि राजकारण हे सर्व पाहायला मिळेल.





# राजामौलींच्या पुढील चित्रपटात ऐश्वर्या

लवकरच दिसणार ‘या’ चित्रपटात

साउथ दिग्दर्शक एस एस राजामौली आपल्या भव्य दिव्य चित्रपटांमुळे चर्चेत असतात. नुकत्याच काही दिवसांपूर्वी रिलीज झालेला ‘आरआरआर’ चित्रपटाने जगभरातील प्रेक्षकांना भुरळ पाडली होती. शिवाय या चित्रपटाने बॉक्स ऑफसवर देखील चांगलाच गल्ला जमावला होता. राजामौलींच्या ‘आरआरआर’ आणि ‘बाहुबली’ चित्रपटाच्या दोन्ही पार्टने भरघोस कमाई केली होती. या चित्रपटांनी असे रेकॉर्ड तयार केले आहेत ज्याला बॉलिवूडमधील कोणताच चित्रपट तोडू शकत नाही. याचं दरम्यान अशी बातमी समोर येत आहे की, एस एस राजामौली आता लवकरच बॉलिवूडच्या या दिग्गज अभिनेत्रीसोबत काम करणार आहेत. ज्याची चर्चा आता सर्वत्र होत आहे.

एस एस राजामौलींच्या चित्रपटात ऐश्वर्या राय


बॉलिवूडची अभिनेत्री ऐश्वर्या राय लवकरच एस एस राजामौली यांच्या चित्रपटामध्ये दिसण्याची शक्यता सांगितली जात आहे. मात्र याबाबत अजून कोणतीही अधिकृत बातमी समोर आली नाही, परंतु ही बातमी समोर येताच दोघांचेही चाहते उत्सुक झाले आहेत. माहितीनुसार ऐश्वर्या रायने अनेक साउथ चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. इतकचं नव्हे तर अभिनयाची खरी सुरुवात ऐश्वर्याने साउथ चित्रपटातूनच केली होती.

या चित्रपटात दिसणार ऐश्वर्या

बऱ्याच वर्षांनंतर ऐश्वर्या पुन्हा अभिनय क्षेत्रात पदार्पण करत आहे, ऐश्वर्या राय लवकरच साउथमधील ‘पोन्नियिन सेलवन’ चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

# फायटर’ चित्रपटासाठी ऋतिक रोशन आणि दीपिका पादुकोण घेणार मार्शल आर्टचे ट्रेनिंग

बॉलिवूड अभिनेता ऋतिक रोशनने गेल्या आठवड्याच त्याच्या आगामी ‘विक्रम वेधा’ चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. या चित्रपटामध्ये ऋतिक रोशन अभिनेता सैफ अली खानसोबत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. दरम्यान आता ‘विक्रम वेधा’चे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर ऋतिक रोशन अभिनेत्री दीपिका पादुकोणसोबत आगामी ‘फायटर’ चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरूवात करणार आहे. ‘फायटर’ चित्रपटाच्या माध्यमातून ऋतिक आणि दीपिका पहिल्यांदा एकत्र काम करणार आहेत.



सूत्रांच्या माहितीनुसार, ऋतिक रोशन या चित्रपटामध्ये ऍक्शन मोडमध्ये दिसून येईल तसेच यासाठी त्याने मार्शल आर्टची ट्रेनिंग सुद्धा सुरू केली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा : महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी



। पंचकुला । महाईन्यूज

महाराष्ट्राच्या दोन्ही खो-खो संघांनी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी सुवर्णपदके पटकावली. मात्र हरयाणाच्या बॉक्सिंगपटूंनी महाराष्ट्राच्या तुलनेत दर्जेदार कामगिरी केली. त्यामुळे स्पर्धेअंती महाराष्ट्राला पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले, तर हरयाणाने बाजी मारली.

या स्पर्धेतील अग्रस्थानासाठी महाराष्ट्र आणि हरयाणा यांच्यात अखेरच्या दिवसापर्यंत चढाओढ सुरू होती. मात्र यजमान हरयाणाला अखेरीस वरचढ ठरण्यात यश आले. अंतिम पदकतालिकेत अग्रस्थान पटकावणाऱ्या हरयाणाच्या खात्यावर ५२ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ४६ कांस्य अशी एकूण १३७ पदके होती. तर दुसऱ्या स्थानावरील महाराष्ट्राने ४५ सुवर्ण, ४० रौप्य आणि ४० कांस्यपदकांसह एकूण १२५ पदके पटकावली. सोमवारी महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात ओडिशावर २१-२० असा निसटता

## भारतासाठी 'करो या मरो'ची स्थिती

# विशाखापट्टणममध्ये रंगणार तिसरा टी - 20 सामना!

### दक्षिण आफ्रिकेने पाच सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी आघाडी

। कटक । महाईन्यूज ।

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान पाच सामन्यांची टी २० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील तिसरा टी २० सामना विशाखापट्टणम येथील एसीए-व्हिडीसीए क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी सात वाजता खेळवला जाणार आहे. या मालिकेतील सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकून दक्षिण आफ्रिकेने मालिकेत २-० अशी आघाडी घेतलेली आहे. अशा परिस्थितीत हा सामना जिंकून मालिका आपल्या नावावर करण्याचा मानस घेऊन पाहुणे मैदानात उतरतील. तर, आजचा सामना जिंकून मालिकेत आपले आव्हान टिकवण्यासाठी यजमान प्रयत्न करतील.

सामन्याच्या दिवशी विशाखापट्टणममधील तापमान ३१ अंश सेल्सिअसच्या




**संभाव्य भारतीय संघ**

ईशान किशन, ऋतुराज गायकवाड, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (कर्णधार आणि यष्टिरक्षक), हार्दिक पंड्या, दिनेश कार्तिक, अक्षर पटेल, हर्षल पटेल, भुवनेश्वर कुमार, युझवेंद्र चहल, आवेश खान किंवा अर्शदीप सिंग.

**संभाव्य दक्षिण आफ्रिका संघ**

टेम्बा बावुमा (कर्णधार), रीझा हेंड्रिक्स, ड्वेन प्रिटोरियस, रॉस व्हॅन डेर डुसेन, हेनरिक क्लासेन (यष्टीरक्षक), डेव्हिड मिलर, वेन पार्नेल, कागिसो रबाडा, केशव महाराज, एनरिक नॉर्किया, तबरेझ शम्सी.

आसपास राहण्याची शक्यता आहे. खेळादरम्यान पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली नाही. सामन्यादरम्यान ताशी १३ किलो मीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. डॉ. वायएस राजशेखर रेड्डी क्रिकेट स्टेडियमची खेळपट्टी गोलंदाजीसाठी अनुकूल आहे. वेगवान गोलंदाज आणि फिरकीपटू दोघांनाही ती उपयुक्त ठरेल असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## दहा महिन्यांच्या विश्रांतीनंतर

# भारताचा 'गोल्डन बॉय' मैदानावर उतरण्यास सज्ज



।टोक्यो । महाईन्यूज ।

भारताचा ऑलिम्पिक हिरो नीरज चोप्रा या आठवड्यात पुन्हा एकदा मैदानावर उतरण्यासाठी करण्यासाठी सज्ज झाला आहे. फिनलंडमध्ये होणाऱ्या पावो नूरमी गेम्स २०२२ या स्पर्धेमध्ये तो भाग घेणार आहे. टोक्यो ऑलिम्पिकनंतर भालाफेकपटू नीरजची ही पहिलीच स्पर्धा असेल. आज (१४ जून) फिनलंडमधील तुर्कू येथील पावो नूरमी स्टेडियममध्ये पावो नूरमी गेम्स 2022ची सुरुवात होणार आहे. पावो नूरमी गेम्स ही स्पर्धा ही जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूरमधील दुसरी प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धा आहे. डायमंड लीगनंतर पोवो नूरमी गेम्सचा क्रमांक लागतो.

नीरज चोप्रा व्यतिरिक्त, ग्रेनेडाचा विद्यमान जगज्जेता अँडरसन पीटर्स, टोक्यो २०२० ऑलिम्पिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेता चेक प्रजासत्ताकचा जेकब वडलेज आणि लंडन २०२१ ऑलिम्पिक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता त्रिनिदाद आणि टोबॅगोचा केशॉर्न वॉल्कोट हे पुरुषांच्या १०-ॲथलीट भालाफेक स्पर्धेत सहभागी होणार आहेत. चोप्राचा कट्टर प्रतिस्पर्धी व जर्मन खेळाडू जोहान्स वेटरदेखील तुर्कू येथील स्पर्धेत सहभागी होणार होता. परंतु, त्याने स्पर्धेतून माघार घेतली आहे. त्याचे देशबांधव ज्युलियन वेबर आणि अँड्रियास हॉफमन मात्र याठिकाणी येणार आहेत. टोक्यो ऑलिम्पिकनंतर नीरज चोप्रा जवळपास १० महिने स्पर्धांपासून दूर होता.


महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही